नियमित दिवाणी दावा २५/२०१८
विरसिंग दित्या वळवी विरुध्द
शामसिंग दित्या वळवी.
<u>निशाणी क्रमांक ७५/क–पुढे</u>

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. ०२ – धिरसिंग दित्या वळवी यांचा पुढील सरतपास वादीचे वकील श्री. जे. बी. दुसाणे यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

८. आता मला माझा निशाणी ७५ वरील पुराव्याचे शपथपत्र दाखविण्यात आले. त्यावर मी अंगठा केला आहे. माझा शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>प्रतिवादीतर्फे उलटतपास विधिज्ञ श्री. ऐ. जे. वळवी यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

९. मी आजरोजी न्यायालयात साक्षी देण्यासाठी आलेलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे सख्खे भाऊ आहेत. मला दाव्यातील दावमिळकतीचा सर्वे क्रमाक अथवा गट क्रमांक सांगता येणार नाही. वादमिळकत माझा मामाने दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मामाने आमच्या आईला दिली होती. मला वादमिळकतीची चतुसिंमा सांगता येणार नाही. मयत प्रतिवादी श्यामसिंग याचे शिक्षण १३ वी पर्यंन्त झाले होते. सुधाकर यांचे शिक्षण १३ वी पर्यंन्त झाले आहे. प्रतिवादी क्र. ४ सावंती हिचे शिक्षण झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ४ सावंती हिचा वाद मिळकतीत हक्क नसल्याचे मी खोटे सांगत नाही. माझे वडील यांनी प्रथम काही दिवस शिक्षक म्हणुन काम केले होते. त्यानी काही दिवसांनी नोकरी सोड्डुन दिली होती. त्यानंतर ते शेती करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, वाटणी तोंडी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार क्रमांक ८१ व १४० विरुध्द मयत प्रतिवादी शामसिंग याने अपिल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रांत अधिकारी, जिल्हाधिकारी व विभागिय आयुक्तांनी अपीलाचा निकाल शामसिंग वळवी याच्या बाजुने दिला होता.

**प्रश्न –** देवलीपाडा येथील गट क्रमांक १ मधील जमीन तुम्ही चारही भावांनी आप–

आपसांत वाटुन घेतली होती.

**उत्तर –** आम्ही पाच भावांनी वाटुन घेतली होती.

१०. वादमिळकत प्रतिवादींना न देण्याबाबत माझा आईने सांगितले होते. त्यामुळे वादमिळकत प्रतिवादींना देण्यास आमचा नकार आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटे शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्षी देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**माझे समक्ष**

**xx/sd**

**(धनजंय एस. देवरे)**

दिनांकः ०२.०२.२०२६

सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर

नवापुर.

**<u>प्रमाणपत्र</u>**

साक्षीदार हा आदिवासी भाषीक असल्यामुळे दुभाषीक न्यायालयांचे विधिज्ञ श्री. व्ही. आर. वसावे यांच्या मार्फत अनुवादीत करुन नोंदविण्यात आलेला आहे. साक्षीदारास तो वाचुन व समजावुन सांगितला असता तो बरोबर असल्याचे साक्षीदाराने मान्य केले आहे.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

**xx/sd**

**(धनजंय एस. देवरे)**

दिनांकः ०२.०२.२०२६

सह .दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,नवापूर